

भिवरी (ता. पुरंदर) : रस्त्याचे उद्घाटन करताना भारत फोर्जच्या सीएसआर विभागाच्या प्रमुख लीना देशपांडे.

# भारत फोर्जच्या मदतीने भिवरीत कॉंक्रिटचा रस्ता

**गराडे, ता. २४ :** भिवरी (ता. पुरंदर) येथे भारत फोर्ज यांच्या अर्थसाहाय्याने केलेल्या ८ लाख रुपये खर्चाच्या सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचा लोकार्पण सोहळा भारत फोर्जच्या सीएसआर विभागाच्या प्रमुख लीना देशपांडे यांच्या हस्ते झाला.

या वेळी जलतज्ज्ञ सागर काळे, जयदीप लाड यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी ग्रामविकास अधिकारी अविनाश निगडे, गुलाब घिसरे, दिलीप कटके, सखाराम कटके, संजय दि. कटके, संदीप कटके, भिकाजी कटके, जगन्नाथ कटके, नामदेव ढवळे, विशाल कटके, हनुमंत साळुंके आदी उपस्थित होते. दिलीप कटके यांनी प्रास्ताविक; तर माऊली घारे यांनी सूत्रसंचालन केले. गुलाब घिसरे यांनी आभार मानले.